ePaper **आधी अन्न त्याग, नंतर पाणी त्याग; मस्साजोगमधील ग्रामस्थांचा आर या पारचा इशारा**


| वर्ष - 8 । अंक - 214 | UDYAM-MH-26-0158827 |




# महाईन्यूज(TM)

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 18 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- स्मृतीच्या खेळीने दिल्लीची दाणादाण!
- टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी सज्ज!
- शेजारच्या देशाला शत्रू पाहणे अन्याय!
- जातीपातीच्या पलीकडे विचार पाहिजे


### काँग्रेसने आक्षेप नोंदवल्यावरही रात्री उशिरा निर्णय

# ज्ञानेश कुमार मुख्य निवडणूक आयुक्त!

## नव्या कायद्यानुसार सरन्यायाधीशांना वगळून निवड

। नवी दिल्ली ।महाईन्यूज

**नरेंद्र मोदी सरकारने २०२३ मध्ये संसदेत मंजूर केलेल्या नव्या कायद्यानुसार देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवडीसाठीच्या बैठकीतून सरन्यायाधीशांना वगळण्यात आले आहे. या कायद्यालाच काँग्रेसने आव्हान दिले आहे. यावरील सुनावणी बुधवारी अपेक्षित असताना आयुक्तांच्या निवडीबाबत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या उपस्थितीत सोमवारी बैठक पार पडली. त्यावर काँग्रेसने आक्षेप नोंदवल्यावरही सोमवारी रात्री उशिरा मुख्य निवडणूक आयुक्तपदी ज्ञानेश कुमार यांची निवड करण्यात आली.**



मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार आज, मंगळवारी सेवानिवृत्त निवृत्त होणार आहेत. ज्ञानेश कुमार हे सर्वात वरिष्ठ निवडणूक आयुक्त असल्याने त्यांचीच या पदावर नियुक्ती झाली आहे. त्यांचा कार्यकाळ २६ जानेवारी २०२९ पर्यंत राहील. मात्र या नव्या नियुक्तीच्या दरम्यान काही घडले, तर ते न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहील, असे राहील, असे न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने यापूर्वीच्या सुनावणीत स्पष्ट केले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्त यांची नियुक्ती भारताचे राष्ट्रपती करतात. पंतप्रधान (अध्यक्ष), लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि पंतप्रधानांनी नामनिर्देशित केलेल्या केंद्रीय मंत्र्यांचा समावेश असलेल्या निवड समितीच्या शिफारशींनुसार ही नियुक्ती केली जाते. राजीव कुमार निवृत्त होण्यापूर्वी नवीन मुख्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करण्यासाठी निवड समितीची महत्वाची बैठक सोमवारी सायंकाळी पार पडली. त्यात राहुल यांच्यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी, कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल उपस्थित होते. या बैठकीनंतरच काँग्रेसने ही बैठक घाईघाईत बोलावल्याचा आरोप करताना न्यायलयीन सुनावणीनंतरच ती घ्यायला हवी होती, असा आग्रह काँग्रेसने धरला.

### काँग्रेसचे सर्वोच्च न्यायालयात आव्हान

सन २०२३ च्या नव्या कायद्यानुसार या निवड समितीतील पदाधिकाऱ्यांमध्ये पंतप्रधान, एक केंद्रीय मंत्री व विरोधी पक्षनेते असतात. याला काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यानंतर 'कायदे करणे हा संसदेचा सर्वाधिकार आहे. या समितीची स्वतंत्रता व निष्पक्षता कायम राखण्यासाठी यात फक्त कार्यपालिकेचे वर्चस्व न राखता घटनात्मक पदावर असलेल्या सरन्यायाधीशांना समाविष्ट केले पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते,' असे ज्येष्ठ विधिज्ञ अभिषेक मनु सिंघवी यांनी सांगितले.

### खा. डॉ. अमोल कोल्हे खासगी कार्यक्रमाला आले

## पिंपरी-चिंचवड: अतिक्रमण कारवाईबाबत व्यापाऱ्यांची साधी विचारपुसही नाही

### लोकसभा, विधानसभा निवडणुकीतील आश्वासनांचा पडला "विसर"

। पिंपरी- चिंचवड ।महाईन्यूज

**शिरूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये एका खासगी कार्यक्रमाला भेट दिली. मात्र, स्वत:च्या मतदार संघात कुदळवाडी येथे सुरू असलेल्या अतिक्रमण कारवाईबाबत व्यापारी आणि लघु उद्योजकांची साधी विचारपुसही केली नाही. किंबहुना, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेवून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे अतिक्रमण कारवाईने बाधित मालमत्ताधारकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.**




लोकसभा निवडणुकीत चिखली-कुदळवाडी भागातून डॉ. अमोल कोल्हे यांना मताधिक्य आहे. तसेच, विधानसभा निवडणुकीतसुद्धा भोसरी मतदार संघातील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार अजित गव्हाणे यांना या परिसरात मतदाधिक्य असल्याचे सांगितले जाते. विधानसभा निवडणूक झाल्यानंतर अधिवेशनामध्ये बांगलादेशी व रोहिंग्या यांचा मुद्दा चर्चेत आला. त्यावेळी डॉ. कोल्हे यांनी स्वत: भूमिका स्पष्ट केली होती. " विशिष्ट समाजाला टार्गेट करण्यात येत असले, तर मी स्वत: कुदळवाडीला भेट देणार आहे."

### लघु उद्योजक, व्यापाऱ्यांना आधार मिळेल का?

काही दिवसांपूर्वी, मुस्लिम समाजाच्या नेत्या रुहिनाज शेख यांनी यावर जाहीरपणे भाष्य केले होते. 'सोशल मीडिया' वर पोस्ट करीत त्यांनी "खासदार कोठे हरवले आहे?" असा प्रश्न उपस्थित केला होता. कुदळवाडीतील कारवाईमध्ये तोडगा काढण्यासाठी राजकीय नेत्यांनी पुढाकार घेतला नाही. काही व्यापारी न्यायालयात गेले आणि न्यायालयाने याचिका फेटाळली. तसेच, "सरसकट कारवाई करा" असे निर्देश न्यायालयाने प्रशासनाला दिले. त्यामुळे कुदळवाडीतील सुमारे 800 एकर क्षेत्रावर अतिक्रमण कारवाई झाली. लघु उद्योजक आणि व्यापाऱ्यांना अधिकृतपणे नव्याने उभा करण्यासाठी सरकार आणि लोकप्रतिनिधी पुढाकार घेतील का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला आहे.

# न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागू नये

## मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमुर्ती मोहिते डेरे यांचे मत

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शिवकालीन न्यायव्यवस्थे मध्ये सामंजस्याने वाद कसे मिटवीले जातील याला प्राधान्य दिले जात असे तथापि सद्यस्थितीत सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागू नये. नागरिकांना तालुकास्तरीय कनिष्ठ न्यायालया मध्येच न्याय मिळाला पाहिजे, अशी अपेक्षा मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमुर्ती श्रीमती रेवती मोहिते डेरे यांनी व्यक्त केली.**



जुन्नर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश आणि दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर आदी न्यायालयांच्या उदघाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार व मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती संदीप मारणे , आरिफ डॉक्टर, पुणे जिल्हा सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन , सत्र न्यायाधीश एस.एस.नायर , बार कौन्सिल महाराष्ट्र गोवाचे उपाध्यक्ष ॲड. अहमदखान पठाण , आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके , बाळासाहेब दांगट, बाजार समितीचे सभापती संजय काळे, विघ्नहर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.शिवदास तांबे, उपाध्यक्ष ॲड.महावीर चोरडिया, ॲड.अजीज खान, सचीव ॲड.आशिष वानखेडे, वकील बार असोसिएशनचे सर्व आजी – माजी पदाधिकारी , नागरिक उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले की , लोकशाहीच्या रक्षणात नागरीकांसाठी न्यायव्यवस्थेचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. राज्यातील न्यायालयांचे आधुनीकीकरण करने शासनाचे धोरण आहे. त्यामुळे न्यायालयाच्या इमारतींचे विस्तारीकरण करणेही तितकेच गरजेचे आहे. सत्र न्यायालयामुळे जुन्नर तालुक्यातील पक्षकार व वकिलांना खेड, पुणे येथे जावे लागणार नाही. परिणामी तालुक्यातील न्यायालयीन व्यवस्था यानिमित्ताने अधिक गतिमान होईल. जुन्नर न्यायालयात मीटिंग हॉल, आधुनिक ग्रंथालय, इतर आवश्यक सुविधा यासाठी विकास आराखाडा तयार करा . तसेच ब्रिटिश कालीन न्यायालयाच्या हेरिटेज इमारतीचे संवर्धन करा . अशा सुचना अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. (जुन्नर येथे सत्र न्यायालयाच्या उदघाटन प्रसंगी बोलताना मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे , यावेळी उपस्थित उपमुख्यमंत्री अजित पवार व मान्यवर.अजित पवार व मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती संदीप मारणे , आरिफ डॉक्टर, पुणे जिल्हा सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन , सत्र न्यायाधीश एस.एस.नायर , बार कौन्सिल महाराष्ट्र गोवाचे उपाध्यक्ष ॲड. अहमदखान पठाण , आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके , बाळासाहेब दांगट, बाजार समितीचे सभापती संजय काळे, विघ्नहर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्षनागरिक उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले की , लोकशाहीच्या रक्षणात नागरीकांसाठी न्यायव्यवस्थेचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

### विकास आराखाडा तयार करा

राज्यातील न्यायालयांचे आधुनीकीकरण करने शासनाचे धोरण आहे. त्यामुळे न्यायालयाच्या इमारतींचे विस्तारीकरण करणेही तितकेच गरजेचे आहे. सत्र न्यायालयामुळे जुन्नर तालुक्यातील पक्षकार व वकिलांना खेड, पुणे येथे जावे लागणार नाही. परिणामी तालुक्यातील न्यायालयीन व्यवस्था यानिमित्ताने अधिक गतिमान होईल. जुन्नर न्यायालयात मीटिंग हॉल, आधुनिक ग्रंथालय, इतर आवश्यक सुविधा यासाठी विकास आराखाडा तयार करा . तसेच ब्रिटिश कालीन न्यायालयाच्या हेरिटेज इमारतीचे संवर्धन करा . अशा सुचना अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. (जुन्नर येथे सत्र न्यायालयाच्या उदघाटन प्रसंगी बोलताना मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे , यावेळी उपस्थित उपमुख्यमंत्री अजित पवार व मान्यवर. शिवकालीन न्यायव्यवस्थे मध्ये सामंजस्याने वाद कसे मिटवीले जातील याला प्राधान्य दिले जात असे तथापि सद्यस्थितीत सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागू नये.

---

# गिर्यारोहणातही करिअर होऊ शकते?

## उत्तर देण्यासाठी सुरु झालेल्या संस्थेच्या दशकपूर्तीची गोष्ट

। मावळ ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आजवर उपेक्षित असलेल्या गिर्यारोहण क्षेत्रास केवळ समाजाभिमुख नाहीतर उच्च शिक्षण प्रशिक्षण व्यासपीठ देणाऱ्या गिरिप्रेमीच्या 'गार्डियन गिरिप्रेमी इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरिंग' (जीजीआयएम) संस्थेस १६ फेब्रुवारीला दहा वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने संस्थेच्या या आडवाटांवरील प्रवासाचा हा आढावा...**





'आता कुठली नवीन मोहीम?' किंवा 'आज कुठल्या डोंगरावर?' गेल्या अनेक वर्षांत हे प्रश्न मित्रमंडळी आणि आप्तांकडून ऐकणे सरावाचे झालंय. पूर्वी या प्रश्नांत कुतूहल, काळजी आणि चौकशी असायची, पण अलीकडे त्यात आपुलकीही जाणवते. यामागचे मुख्य कारण म्हणजे गिर्यारोहणाला समाजात मिळालेला लोकाश्रय. आजच्या घडीला गिर्यारोहण आणि साहस हा केवळ काही मोजक्या लोकांचा छंद न राहता समाजाच्या सर्व स्तरांमध्ये त्याचे पडसाद दिसत आहेत, त्याची व्याप्ती वाढत आहे, किंबहुना त्याही पलीकडे गिर्यारोहण क्षेत्रात पूर्ण वेळ करियर घडू शकते ही बाब हळूहळू सर्वांना उमजू लागली आहे. अशा प्रकारचे करियर करायची संधी मला ज्या संस्थेमुळे मिळाली ती म्हणजे 'गार्डियन गिरिप्रेमी इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरिंग' अर्थात 'जीजीआयएम'ची. आज या संस्थेच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त, हा संपूर्ण प्रवास आठवत असताना असंख्य आठवणी मनात तरळत आहेत. सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यांतली सुरुवातीची भटकंती, बेलाग कड्यांवर केलेले प्रस्तरारोहण, हिमालयातील बर्फाच्छादित डोंगरांवर पहिल्यांदा ठेवलेले पाऊल, आणि तिथून पुढे भारतातील व जगातील सर्वोच्च शिखरांपर्यंतचा प्रवास आणि अशा अनेक!गिरिप्रेमीच्या २०१२-१३ च्या एव्हरेस्ट मोहिमेचा मी भाग होतो आणि २०१३ साली प्रत्यक्ष 'सगरमाथा' अर्थात 'एव्हरेस्ट'च्या कृपेने मी भारताचा तिरंगा घेऊन पृथ्वीच्या सर्वोच्च बिंदूवर काही क्षण आनंदाचे वेचू शकलो. भारतातील सर्वांत मोठी नागरी मोहीम यशस्वी करून परत आल्यावर, एव्हरेस्ट पुरतेच न थांबता गिर्यारोहण क्षेत्रात काहीतरी मोठे करायचे असा आम्ही सर्व गिरिप्रेमींनी संकल्प सोडला. सह्याद्रीच्या कुशीत गिर्यारोहणाची एखादी प्रशिक्षण संस्था सुरू करता येईल.

### वेगळे करण्याची माझी खूप इच्छा

मला गिर्यारोहण या विषयातील समज आल्यापासूनच या क्षेत्रात काहीतरी वेगळे करण्याची माझी खूप इच्छा होती. म्हणजे परदेशी गिर्यारोहक जसे फक्त पर्वतारोहण हेच उपजीविकेचे साधन म्हणून वापरतात तसे भारतातही काहीतरी करू शकतो का, असा मी नेहमी विचार करत असे. गिरिप्रेमीच्या प्रशिक्षण संस्थेच्या या विचाराने माझ्या मनाचा ठाव घेतला. २०१५ साली जशी उमेश झिरपे यांनी प्रशिक्षण संस्थेची म्हणजे गार्डियन गिरिप्रेमी इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरिंग'ची ('जीजीआयएम') मुहूर्तमेढ रोवली, तसा मी लगेचच त्या प्रकल्पाचा काया-वाचा-मने भाग झालो.

## पीएमआरडीए प्रशासनाची माहिती

# माण-हिंजवडी मेट्रोचे काम वेगात!

### माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गाचे काम सुमारे 82 टक्के पूर्ण

। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो मार्गाचे काम सध्या सुमारे ८२ टक्के पूर्ण झाले आहे. तर, एक किलोमीटरच्या 'वायडक्ट'च्या कामाला गती मिळाली आहे. ही कामे पूर्ण करून ऑक्टोबर २०२५ पर्यंत मेट्रो सुरू होईल, अशी माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) प्रशासनाने दिली आहे.**



पुणे प्रादेशिक क्षेत्रीय विकास प्राधिकरण यांच्याकडे हा प्रकल्प आहे. 'पीपीपी' (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) तत्त्वावर हे काम सुरू आहे. तत्पूर्वी दिरंगाईमुळे 'पीएमआरडीए'ने ठेकेदाराला दंडात्मक कारवाईचा इशारा देत काम पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ दिली. त्यानंतर जुलैपासून काम वेगाने सुरू आहे.

हिंजवडी (माण, मेगापोलीस) ते शिवाजीनगर हा पुणे आणि पिंपरी चिंचवड या शहरांना जोडणारा हा मेट्रो प्रकल्पातील तिसरा मेट्रो मार्ग आहे. हा संपूर्ण मार्ग उन्नत असून, पुणे-बंगळुरू महामार्ग आणि मुळा नदीवरून जात आहे. प्रामुख्याने बाणेर, सकाळनगर आणि सिव्हिल कोर्ट स्थानकांची कामे शिल्लक आहेत. यांसह विविध ठिकाणी जिने आणि अकरा स्थानकांचे महत्त्वाचे काम बाकी आहे. ही कामे पूर्ण झाल्यानंतर मेट्रोची 'ट्रायल रन' घेण्यात येणार आहे.



#### असा आहे प्रकल्प

८,३१३ कोटी रु. - प्रस्तावित खर्च
२३.३ कि.मी. - मेट्रो मार्गाचे अंतर
२३ - एकूण स्थानकांची संख्या
१२ - कामे पूर्ण झालेली स्थानके

> मेट्रो प्रकल्पातील एक किलोमीटर 'वायडक्ट'चे काम शिल्लक आहे. बहुतांश काम पूर्ण होताच मार्ग सुरक्षा तपासणी केली जाईल आणि ऑक्टोबरपर्यंत मेट्रो सुरू होईल. सध्या ८२ टक्क्यांपर्यंत काम पूर्ण झाले आहे.
>
> – **रिनाज पठाण,** कार्यकारी अभियंता, पीएमआरडीए

---

## 'छावा' चित्रपट महाराष्ट्रभरात करमुक्त व्हावा!

### भाजपाचे हिंदूत्ववादी आमदार महेश लांडगे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे मागणी

। पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रावेत येथील आवास योजनेचा प्रकल्प रद्द केल्यानंतर या प्रकल्पातील लाभार्थ्यांना आता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतर्गत प्राप्त होणाऱ्या किवळेतील सदनिका देण्यात येणार आहेत. या एका सदनिकेची किंमत १३ लाख ७१८ रुपये आहे. या दरामध्ये ज्या लाभार्थ्यांना लाभ घ्यावयाचा आहे, त्या लाभार्थ्यांनी १५ मार्चपर्यंत संमतीपत्र सादर करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.**




हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांची शौर्यगाथा उलगडणारा आणि जीवनचरित्रावर आधारित "छावा " चित्रपट दि. 14 फेब्रुवारी रोजी देशभरात प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला पहिल्याच दिवसापासून शिवभक्त आणि सिनेचाहत्यांचा उदंड प्रतिसाद मिळत असून सिनेमागृहात चाहत्यांची तुफान गर्दी पाहायला मिळत आहे.

हिंदूत्वासाठी बलिदान देणाऱ्या संभाजी राजांचा इतिहास मोठ्या पडद्यावर अधिकाधिक नागरिकांना पहायला मिळावा. त्याद्वारे शिव-शंभू विचारांचा जागर व्हावा यासाठी महाराष्ट्रभरात "छावा" चित्रपट करमुक्त करावा, अशी मागणी भाजपा नेते तथा हिंदूत्ववादी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, हिंदवी स्वराज्यासाठी बलिदान देणारे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जाज्वल्य इतिहास नव्या पिढीसमोर मांडण्याचा प्रयत्न छावा या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शक लक्ष्मण उत्तेकर यांनी केला आहे. अभिनेते विकी कौशल यांनीही हिंदुभूषण धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका अत्यंत प्रभावीपणे साकारली आहे. त्यामुळे हा चित्रपट शिव-शंभू प्रेमींच्या पसंतीस उतरत आहे. संभाजीराजांनी आपल्या कारकिर्दीमध्ये 125 यशस्वी लढाया लढल्या आहेत. या काळात ते एक कुटुंबप्रमुख म्हणून, पती म्हणून, पिता म्हणून, मुलगा म्हणून, राजा म्हणून कसे होते? याचे "छावा" चित्रपटाद्वारे खूप सुंदरपणे सादरीकरण केले आहे. महाराजांचे चरित्र हे खूप प्रेरणादायी आहे. त्यामुळेच, महाराष्ट्रात हा चित्रपट टॅक्स मुक्त करावा, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

> धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वात उंच पुतळा पिंपरी-चिंचवडमध्ये मोशी या ठिकाणी उभारण्याची संकल्पना आम्ही प्रत्यक्षात आणत आहोत. "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण"चे काम प्रगतीपथावर आहे. दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी महाराजांचा इतिहास रुपेरी पडद्यावर भव्य-दिव्यपणे मांडला आहे. तो अधिकाधिक नागरिकांना पहायला मिळावा. त्याद्वारे शिव-शंभू विचारांचा जागर व्हावा. यासाठी "छावा" चित्रपट करमुक्त झाला पाहिजे. यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे. आमचे हिंदूत्ववादी सरकार यासाठी सकारात्मक निर्णय घेईल, असा विश्वास वाटतो.
>
> **–महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### नाम भावयुक्त अंतःकरणाने घ्यावे।

मला आज देवाची गरज अशी वाटत नाही हे खरे, पण ती कशी वाटेल याचा तरी आपण विचार करावा. भगवत्चिंतनाने, नामाने ही गरज भासू लागते. गरज इतकी भासली पाहिजे की, अन्नपाणीसुद्धा गोड लागू नये. जितकी आग जोराची तितका पाण्याचा मारा जास्त हवा, तसे जितकी देहबुद्धी बळकट तितका नामाचा जोर अधिक पाहिजे. नामात प्रेम नाही म्हणून ते घेण्याचे सोडू नये. पाण्यात पडल्यावर पुढे पोहायला येते. काशीला गेले नाही तरी काशीस जायचे असे तरी म्हणावे; त्याप्रमाणे नामात प्रेम वाटत नसले तरी, नामात प्रेम आहे असे नित्य म्हणावे. नामाशिवाय दुसरे सत्य नाही, दुसरे साधन नाही, असा दृढ विश्वास झाला म्हणजे नाम घेतल्याशिवाय राहवत नाही ; आणि ते घेतल्याने, त्याच्या सहवासाने, त्याचे प्रेम येते. संत देव आहे असे म्हणतात, मीही देव आहे असे म्हणतो; फरक इतकाच की, माझे म्हणणे अनुमानाचे असते, त्यांचे प्रत्यक्ष अनुभवाचे असते. संत देहातीत असतात; त्यांच्याजवळ गेल्याने देहाभिमान कमी होतो. प्रत्यक्ष गेले नाही तरी चालेल; भाव ठेवून कार्य जितके लवकर होते तितके देहाच्या सहवासाने होत नाही. तीर्थास तीर्थपण, देवांस देवपण आणि गुरूंस गुरूपण आपण आपल्या भावनेने देतो. तीर्थास जाऊन जर 'आपण याने निष्पाप होऊ' अशी भावना असली तरच मला तीर्थाचे स्नान होईल, नाहीतर मला ते नुसते पाणीच आहे ! थोडक्यात म्हणजे, सर्व काही भावनेत आहे. नाम हे भाव उत्पन्न करते. भावयुक्त अंत:करणाने आपण नाम घेतले म्हणजे आपले काम शीघ्र होते. साधूंची अगर संतांची लक्षणे आपल्या अंगात ती बाणून घेण्याकरिता सांगितली आहेत. परंतु त्या लक्षणांवरून साधू ओळखता येणार नाही; साधू होऊनच त्याला ओळखले पाहिजे. प्रापंचिकाला त्याला ओळखायचे असेल तर त्याने आपल्यावर त्याच्या संगतीचा काय परिणाम झाला हे पाहावे; म्हणजे आपल्यावरूनच त्याला ओळखायचे. आपल्या मनाला काही वेळ तरी शांती मिळाली, आपला मीपणा थोडा तरी कमी झाला, मन निर्विषय झाले, निदान निर्विषय राहावे असे वाटू लागले, तर ते साधूचे स्वरूप आहे असे समजावे. साधू सर्वांभूती भगवद्भाव किंवा सर्वत्र मीच आहे असे पाहतात. त्यामुळे सर्वांवर ते प्रेम करतात. सर्वत्र प्रेम करायचे म्हणजे नि:स्वार्थ बुद्धीने योग्य ते करणे. आपण आपलेपणा काहींमध्येच पाहतो, सर्वत्र पाहात नाही, म्हणून द्वैतप्रचीती येते. साधूंचा मीपणा गेल्याने जगात त्यांना सर्वत्र अभेदप्रचीती येते. ते सर्वत्र भगवद्भाव पाहतात, आणि त्यांचे प्रेम अगदी निर्भेळ असते.

**बोधवचन:- सर्वांशी अत्यंत प्रेमाने, निष्कपट प्रेमाने वागावे. आपल्या बोलण्यामध्ये नव्हे, पाहण्यामध्येसुद्धा प्रेम असावे.**

# 'उबाठा गटा' ला घरघर.. अस्तित्वाची लढाई सुरू!



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाची घरघर आता स्पष्टपणे जाणवू लागली आहे आणि त्यांची पळापळही सुरू झाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सत्कार समारंभानिमित्त उडालेल्या धुराळ्यानंतर उबाठा गटाने पुढचे अघटित घडण्यापूर्वीच धावपळ सुरू केली. आदित्य ठाकरे तातडीने राजधानी दिल्लीत डेरेदाखल झाले. ज्या सोहळ्यावरून ठाकरे गटाने ज्येष्ठ नेते शरद पवारांना धारेवर धरले, त्याच समारोहाला ठाकरे गटाचाच एक खासदार उपस्थित होता आणि शिंदेच्या सत्कारानंतर इतर उपस्थितांसोबत त्यानेही टाळ्या पिटल्या. ही वस्तुस्थिती समोर आल्यावर आपल्या नजरेपलीकडे तिकडे दिल्लीत काही वेगळे तर शिजत नाही ना, या शंकेपोटीच आदित्य ठाकरेंना दिल्लीत पाठविण्यात आले असावे, असे म्हणण्यास भरपूर वाव आहे.**

### उबाठा खासदारांची बैठक

आदित्य यांनी देखील आपल्या खासदारांची दिल्लीत बैठक घेतली आणि यापुढे अशा कोणात्याही समारंभाला पक्षाच्या संमतीशिवाय उपस्थित राहू नये, असे फर्मान जारी केले, अनेकांना ते रुचले नाही, हा भाग वेगळा! या सर्व धावपळीला कारणीभूत ठरला तो भोजनाचा कार्यक्रम.. शिवसेनेचे खासदार प्रतापराव जाधव यांनी दिल्लीमध्ये एका भोजन कार्यक्रमाचे आयोजन केले होते आणि त्या भोजनाला ठाकरे गटाचे तीन खासदार उपस्थित होते. यावरही आदित्य ठाकरेंनी आक्षेप नोंदविला आहे, त्या सर्वांना तंबी दिली आहे.

### पूर्वीचे जवळचे सहकारी

तसे पाहिले तर ही सगळी मंडळी दोन-तीन वर्षापूर्वी एकत्रच होती आणि अनेक वर्षापासून एकत्रित होती. त्यामुळे त्यांच्यात स्नेह असणे स्वाभाविक आहे. राजकीय भूमिका वेगळी असली तरी कुणाच्याही डोक्यात चोवीस तास राजकारण नसते. त्यामुळे एरवी सगळे मूळचे शिवसैनिक अगदी मोकळेपणाने एकमेकांना भेटतात, एकमेकांचे क्षेमकुशल विचारतात, परंतु द्वेषाची कावीळ झालेल्यांना हे सौहार्द सहन होणे शक्यच नाही, हे प्रथम लक्षात घ्या!

### मुळात निष्ठाच तकलादू

आपल्या पक्षातील नेत्यांच्या निष्ठा किती तकलादू आहेत, याची जाणीव असल्यामुळेच ठाकरे कुटुंब सतत पक्ष पुन्हा फुटणार तर नाही, या भीतीखाली वावरत असल्याचे दिसते. काही दिवसांपूर्वी ठाकरे गटातील सहा खासदार शिंदे गटात सामील होण्याच्या वाटेवर असल्याची बातमी आली होती. पुढे काय होणार हे काळच ठरवणार आहे !

### भित्या (उबाठा) पाठी ब्रह्मराक्षस

या बातमीनंतर ठाकरे कुटुंब आपल्या प्रत्येक खासदाराकडे संशयाने पाहत आहे. त्यामुळेच शिंदेच्या सत्कार सोहळ्यास आपला खासदार उपस्थित होता आणि त्या आधी प्रतापराव जाधवांच्या मेजवानीत आपले तीन खासदार सामील होते, हे वृत्त कानावर येताच संभाव्य पडझडीच्या भीतीने ते रोखण्यासाठी आदित्य ठाकरे थेट दिल्लीत दाखल झाले. याच्याशी बोलू नका, याच्याकडे पाहू नका, त्याच्याकडे जेवायला जाऊ नका, असे आदेश देऊन लोकांना थोपवावे लागत असेल, तर या लोकांना दोष देण्याऐवजी आपल्यात काय उणिवा आहेत, लोक आपल्याला सोडून का जात आहेत, निष्ठा इतक्या सैल, उठवळ का होत आहेत, या मागील कारणांचा शोध ठाकरेंनी घ्यायला हवा, पण 'भित्यापाठी ब्रह्मराक्षस' अशी त्यांची अवस्था झाली आहे.

वास्तविक, पक्ष तर शरद पवारांचाही फुटला आणि अजूनही त्या पक्षातील काही लोकांचा अजित पवारांसोबत तडजोड करण्याचा आग्रह सुरू आहे, परंतु त्यानंतरही आपल्या आमदारांवर, खासदारांवर अशी बालिश बंधने शरद पवारांनी लादलेली नाहीत, हे लक्षात घ्या. उणिवा दाखवून, धमकावून लोकांना आपल्यासोबत राहण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही, उलट त्याचा विपरित परिणाम होण्याचीच शक्यता अधिक असते. दोन्ही ठाकरेंनी हे समजून घ्यायला हवे.

### निष्ठांचा पाया ठिसूळ कां झाला?

सत्तेचे आकर्षण असतेच. पण सत्ताधाऱ्यांकडून आमीषे दाखविली जात असतील तर मुळात या निष्ठांचा पाया ठिसूळ का झाला, याचे आत्मचिंतन 'मातोश्री'ने करायला हवे. पण, उबाठा गटाचे सर्वेसर्वा असणाऱ्या संजय राऊत यांना तसे वाटत नाही, ही उद्धव ठाकरे यांची खरी शोकांतिका आहे. एकनाथ शिंदे सेना असो अथवा अजितदादा राष्ट्रवादी हे सर्वजण काही भाजपच्या प्रेमापायी एकत्र आले नाहीत, हे उघड आहे. भाजपने साम-दाम- दंड भेदासह ईडी, सीबीआयसारख्याचा ससेमिरा मागे लावल्याने या दोन्ही गटांनी त्यांचा मार्ग धरला. एवढेच नव्हे, तर विनासायास सत्तेचा सारिपाट हाती लागत असल्याने आजच्या आपमतलबी राजकारणात कोण मागे हटेल ?, यातच मूळ प्रश्नाचे उत्तर आहे.

### आठवा, मनसोक्त शिव्या आणि टोमणे

'मातोश्री' वरच्या याच मंडळींनी अजितदादांना, शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मनसोक्त शिव्या दिल्या, टोमणे मारले.. दुसरीकडे भाजपा वर तोंडसुख घेतले. तरीसुद्धा जे आले, त्यांना भाजपा ने बळ दिले. पुन्हा जोडीला अजितदादांची नको असलेली मांडीही दिली, तरी ते नाईलाजास्तव का होईना, सहन कराव लागले. एवढेच नव्हे तर आता अजितदादांसारखा माणूस नाही, आम्ही शिवसेनेचे, बाळासाहेबांचे विचार जपले असे शिंदे गट म्हणत आहे. आता त्याच वाटेने सत्तेच्या मोहापायी ठाकरे गट भाजपकडे जात आहे. जोडीला काँग्रेस-राष्ट्रवादीही आता भाजपा ची गाडी फुल्ल असल्याने व्हाया शिंदे गटामार्फत भाजपशी सोबत करीत आहे, यालाच म्हणायचे राजकारण..!

### सत्तेत घुसण्यासाठी सगळी गडबड

या पार्श्वभूमीवर आता ठाकरे गटानेही जाणारे जाऊ द्यात, म्हणणे चुकीचे आहे. अगोदरच लोकांना वेळीच न रोखल्याने शिंदेंच्यारूपाने ठाकरे गटासाठी राजकीय भस्मासूर उभा ठाकला आहे. आता, त्याच्या अन् सत्तेच्या लोभापायी राजन साळवीसह अनेकजण पुन्हा धनुष्यबाण, पुन्हा शिवसेना' म्हणून उड्या मारू लागलेत. अर्थात हे लोक सत्तेच्या आकर्षणाने आपल्याला सोडून जात आहे, असे उद्धव ठाकरेंना वाटत असेल तर त्यांनीही नाही म्हटले तरी सन २०१९ मध्ये स्वतः भाजपासोबत निवडणूकपूर्व युती करून बहुमत मिळाल्यावरही ज्यांच्या विरोधात निवडणूक लढविली त्यांच्यासोबत कोणत्या कारणाने आघाडी केली याचे उत्तर द्यायला हवे..मुख्यमंत्रिपदासाठी त्यांनी त्यावेळी महाराष्ट्राच्या जनतेने दिलेला जनादेश लाथाडला होता, त्यावेळी आपण वेगळ्या आविर्भावात होतो हेही विसरता कामा नये. त्यामुळे आता त्यांचे सोबती त्याच सत्तेसाठी त्यांना लाथाडत असतील, तर त्यांना अडवणार किती आणि कुठंपर्यंत ? आत्ता राज्यात आणि केंद्रात भारतीय जनता पार्टीची सत्ता आली आहे आणि ती पाच वर्षे टिकणार आहे. उबाठा गटाने कितीही बेडक्या फुगवल्या तरी पाच वर्ष त्यांना विरोधी पक्षातच बसावे लागणार आहे. सध्याची अवस्था पाहता पुन्हा कधी सत्ता येईल का नाही, हे सुद्धा माहित नाही. नेमका हाच धागा पकडून उबाठा गटाचे अनेक आमदार आणि खासदार भाजपमध्ये अथवा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये प्रवेश करीत आहेत आणि उद्धव ठाकरे आपल्या पक्षाच्या अस्तित्वासाठी झगडत आहेत.. नेमके गद्दार कोण, याचा विचार जनताच करत असून विधानसभा निवडणुकीत गद्दारांना त्यांची जागा दाखवली आहे, हे निश्चित !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आता गडकरीसाहेब राष्ट्रवादीत?

## जयंत पाटलांचा टोला अन् सभागृह खळखळून हसलं

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील (शरद पवार) हे दोन्ही नेते त्यांच्या खुमासदार भाषण शैलीसाठी ओळखले जातात. हे दोन्ही नेते बोलत असताना समोर बसलेल्यांनाही उत्सुकता असते की, ते पुढे काय बोलणार. अशात आज इस्लामपूरमधील राजारामबापू इन्स्टिट्यूटच्या एका कार्यक्रमासाठी गडकरी आणि पाटील एकाच व्यासपीठावर आले होते.**





गडकरी आणि पाटील कार्यक्रमासाठी एकत्र आल्याने जयंत पाटील भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा पुन्हा सुरू झाल्या आहेत. दरम्यान जयंत पाटील यांनी, “आता गडकरी साहेब राष्ट्रवादीत प्रवेश करणार अशा बातम्या करू नका”, म्हणत पत्रकारांना टोला लगावला. यापूर्वी महायुतीच्या काही नेत्यांनी जयंत पाटील लवकरच महायुती सरकारमध्ये सहभागी होतील, त्यांच्यासाठी मंत्रिमंडळात एक जागा रिक्त ठेवण्यात आली आहे, असे दावे केले होते. त्यामुळे नितीन गडकरी यांच्या इस्मामपूर दौऱ्यामुळे याबाबत राजकीय वर्तुळात पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. असे असले तरी जयंत पाटील यांच्यासह राष्ट्रवादीच्या (शरद पवार) नेत्यांनी हे दावे फेटाळून लावले आहेत.या कार्यक्रमात बोलताना जयंत पाटील म्हणाले, “गडकरी साहेबांना सहा वाजून दहा मिनिटांनी निघायचे आहे. त्यामुळे मी फार मोठे भाषण करणार नाही. गडकरी साहेबांनी आमच्या प्रगतीशील संस्थेला भेट देत चांगला प्रतिसाद दिला. आमच्या पत्रकारांना एकच विनंती आहे की, आता गडकरी साहेब राष्ट्रवादीत जाणार अशा बातम्या करू नका. तुम्ही कशाची बातमी करता त्यावर पत्रकारितेचा दर्जा ठरतो. पत्रकारांनी एक बातमी केली आणि त्याच्यावरून देशभरातील मोठमोठ्या चिंतन करणारी लोकं पण बातम्या तयार करायला लागली, याचे मला शल्य वाटते. आज गडकरी साहेब आले आहेत. दोन वेगवेगळ्या पक्षांची माणसं एकत्र येऊच शकत नाही अशी धारणा ज्या पत्रकारांची झाली आहे, त्याबद्दल न बोललेलेच बरे.” केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज (सोमवारी) सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आणि व्यायामशाळेचे उद्घाटन केले. या कार्यक्रमासाठी गडकरी यांच्यासह राजकीय वर्तुळातील अनेक मान्यवर उपस्थित होते. राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ही महाराष्ट्रातील पहिली संस्था आहे, ज्यांना आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत “ट्विनिंग प्रोग्राम” सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे. सध्या, संस्थेने जगभरातील २६ विद्यापीठांशी करार केले आहेत.गडकरी आणि पाटील कार्यक्रमासाठी एकत्र आल्याने जयंत पाटील भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा पुन्हा सुरू झाल्या आहेत. दरम्यान जयंत पाटील यांनी, “आता गडकरी साहेब राष्ट्रवादीत प्रवेश करणार अशा बातम्या करू नका”, म्हणत पत्रकारांना टोला लगावला. यापूर्वी महायुतीच्या काही नेत्यांनी जयंत पाटील लवकरच महायुती सरकारमध्ये सहभागी होतील, त्यांच्यासाठी मंत्रिमंडळात एक जागा रिक्त ठेवण्यात आली आहे, असे दावे केले होते. त्यामुळे नितीन गडकरी यांच्या इस्मामपूर दौऱ्यामुळे याबाबत राजकीय वर्तुळात पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

### त्यावर पत्रकारितेचा दर्जा ठरतो

जयंत पाटील यांच्यासह राष्ट्रवादीच्या (शरद पवार) नेत्यांनी हे दावे फेटाळून लावले आहेत.या कार्यक्रमात बोलताना जयंत पाटील म्हणाले, “गडकरी साहेबांना सहा वाजून दहा मिनिटांनी निघायचे आहे. त्यामुळे मी फार मोठे भाषण करणार नाही. गडकरी साहेबांनी आमच्या प्रगतीशील संस्थेला भेट देत चांगला प्रतिसाद दिला. आमच्या पत्रकारांना एकच विनंती आहे की, आता गडकरी साहेब राष्ट्रवादीत जाणार अशा बातम्या करू नका. तुम्ही कशाची बातमी करता त्यावर पत्रकारितेचा दर्जा ठरतो. पत्रकारांनी एक बातमी केली आणि त्याच्यावरून देशभरातील मोठमोठ्या चिंतन करणारी लोकं पण बातम्या तयार करायला लागली, याचे मला शल्य वाटते

# जातीपातीच्या पलीकडे विचार केला पाहिजे

## ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय आत्मनिर्भरता अशक्य- नितीन गडकरी

। इस्लामपूर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शहराबरोबरच ग्रामीण भागाचा जोपर्यंत विकास होत नाही तोपर्यंत देश आत्मनिर्भर होउ शकत नाही. यासाठी ग्रामीण भागासाठी चांगले रस्ते, पाणी आणि वीज या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे असे प्रतिपादन केंद्रिय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी इस्लामपूर येथे बोलताना केले.**



इस्लामपूर येथे राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी या स्वायत्त अभियांत्रिकी संस्थेच्या नवीन विद्यार्थी वसतीगृह इमारतीचे आणि जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक व्यायामशाळेचे उद्घाटन केंद्रिय मंत्री गडकरी यांच्या हस्ते आज करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आ. जयंत पाटील, खा. विशाल पाटील, आमदार सर्वश्री सुरेश खाडे, अरूण लाड, रोहित पाटील, सुहास बाबर, माजी आमदार मानसिंगराव नाईक, शिवाजीराव नाईक, संस्थेचे अध्यक्ष भगतसिंह पाटील, राजारामबापू कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील आदींसह जिल्ह्यातील मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना मंत्री गडकरी म्हणाले, महात्मा गांधी ९० टक्के लोक खेड्यात राहतात असे सांगत होते. मात्र, आज यापैकी ३५ टक्के लोक शहराकडे स्थलांतरित झाले आहेत. हे स्थलांतर आनंदाने झालेले नाही, तर सुविधांच्या अभावाने झाले आहे. यातून शहरी भागात झोपडपट्ट्या निर्माण झाल्या. जीडीपीमध्ये २२ ते २४ टक्के वाटा उद्योगाचा, ५२ ते ५४ टक्के सेवाक्षेत्राचा आहे, तर केवळ १४ टक्के वाटा ग्रामीण व शेतीचा आहे. जर ग्रामीण भागाचा विकास साधायचा असेल तर चांगले रस्ते, वीज, पाणी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. हे झाले तरच भारत आत्मनिर्भर होउ शकतो. राजकारण हे केवळ निवडणुकीपुरतेच हवे. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी सांगितले होते, निवडून आला नाही तर तुम्ही पक्षाचे, आमदार, खासदार झाला तर जनतेचे आणि मंत्री झाला तर देशाचे हा विचार हवा. राजकारण हे विकासाचे हवे, केवळ सत्तेचे राजकारण देशाचा विकास करू शकत नाही. राजकारणात होणारी टीका ही मनावर फारशी घ्यायची नसते.

### रस्ते विकासाचे श्रेय देत कौतुक

केवळ बातम्यामधून उपस्थित केल्या जाणाऱ्या शंकांमुळे संवेदनशील राहू नये. यावेळी बोलताना आ. पाटील यांनी मंत्री गडकरी यांचे देशभर झालेल्या रस्ते विकासाचे श्रेय देत कौतुक केले. पेठ- सांगली रस्त्याचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४६ टक्के कमी दराने निविदा मंजुरी होउनही चांगल्या दर्जाचे झाले आहे असे सांगत राज्यात मात्र २५ ते ४५ टक्के अधिक दराने रस्त्याची कामे होत असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. आता माध्यमांनी केंद्रिय मंत्री गडकरी राष्ट्रवादीत जाणार अशा बातम्या प्रसारित करू नयेत असा मिश्किल सल्ला देत असे चिंतन करणाऱ्या माध्यमांच्या कृतीचे शल्य वाटते. चांगल्या उद्देशाने राजकीय व्यक्ती एकत्र येउ शकत नाहीत अशी धारणाच झाल्याची खंत आ. पाटील यांनी व्यक्त केली.

# शेजारच्या देशाला शत्रू पाहणे अन्याय!

## पित्रोदांच्या विधानावरून वाद : भाजपाची राहुल गांधींवर टीका

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांचे विधान पुन्हा एकदा वादात सापडले आहे. भारत-चीन वाद हा अमेरिकेने उगाच वाढवला असल्याचे पित्रोदा म्हणाले आहेत. दरम्यान त्यांनी केलेल्या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने काँग्रेसवर जोरदार टीका केली आहे. काँग्रेस पक्षाने भारताची जमीन चीनला देऊन टाकल्याचा आरोप भाजपाकडून करण्यात आला आहे.**



आयएएनएस या वृत्तसंस्थेशी बोलताना सॅम पित्रोदा म्हणाले की, "चीनकडून काय धोका आहे हे मला समजत नाही. मला वाटते की हा मुद्दा अनेकदा प्रमाणाबाहेर वाढवला जातो कारण अमेरिकेला शत्रू कोण आहे याची व्याख्या करण्याची सवय आहे. मला वाटते की सर्व राष्ट्रांनी एकमेकांशी संघर्ष नाही तर सहकार्य करण्याची वेळ आली आहे."नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यादरम्यान अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि चीन यांच्यातील सीमाप्रश्न सोडवण्यासाठी मध्यस्थी करण्याची ऑफर दिली होती. याच्या पार्श्वभूमीवर सॅम पित्रोदा यांनी हे विधान केले आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी दोन देशांमधील चर्चेचा मार्ग आपण स्वीकारला असल्याचे सांगत डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेली ऑफर भारताने नाकारली आहे. दरम्यान पित्रोदा यांनी पुढे बोलताना भारत आणि चीन यांच्यातील वादादरम्यान भारताच्या भूमिकेवरही टीका देखील केली. "असा दृष्टिकोन शत्रू तयार करतो," असे पित्रोदा म्हणाले. "आपण आपली साचेबद्ध पद्धत बदलली पाहिजे. चीन आपला शत्रू आहे हे ठरवणे न्यायाला धरून नाही. फक्त चीनसाठीच नाही, तर सर्वांसाठीच. संवाद वाढवायला शिकण्याची वेळ आली आहे. फक्त आदेश आणि नियंत्रणच नाही तर सहभाग, सहकार्य आणि सह-निर्मिती करा," असेही काँग्रेस नेते पित्रोदा म्हणाले.भाजपाने सॅम पित्रोदा यांच्या विधानावर ताबडतोब टीका केली आहे. तसेच याबरोबरच भाजपाने काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्यावर चीनची स्तुति केल्याचा, तसेच चीनच्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह (बीआरआय)ला पाठिंबा देण्याचा आरोपही केला आहे. भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तुहिन सिन्हा यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत हे गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले की, "ज्यांनी आपली ४०००० चौरस किलोमीटर जमीन चीनच्या स्वाधीन केली, त्यांना अजूनही ड्रॅगनपासून कोणताही धोका दिसत नाही...राहुल गांधी यांना चीनबद्दल कौतुकाची भावना आहे आणि IMEEC जाहीर झाली त्याच्या एक दिवस आधी ते बीआरआय करिता प्रार्थना करत होते यात कोणतेही आश्चर्य नाही. चीनबद्दल काँग्रेस पक्षाला असलेल्या आकर्षणाचे मूळ २००८ च्या गूढ काँग्रेस-सीसीपी सामंजस्य करारात दडलेले आहे."सॅम पित्रोदा यांनी चीनबद्दल व्यक्त केलेले विचार निश्चितच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे विचार नाहीत," असे काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी एक्सवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे. मोदी सरकारवर हल्लाबोल करताना रमेश म्हणाले, "चीन हे आमचे प्राथमिक परराष्ट्र धोरण, बाह्य सुरक्षा आणि आर्थिक आव्हान आहे. काँग्रेसने मोदी सरकारच्या चीनप्रती असलेल्या दृष्टिकोनावर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे, ज्यामध्ये १९ जून २०२० रोजी पंतप्रधानांनी त्यांना जाहीर क्लीन चिट दिली होती. चीनबद्दल आमचे अलीकडील विधान २८ जानेवारी २०२५ रोजी होते."आयएएनएस वृत्तसंस्थेशी बोलताना सॅम पित्रोदा म्हणाले की, "चीनकडून काय धोका आहे मला समजत नाही. मला वाटते की हा मुद्दा अनेकदा अवास्तवपणे उचलला जातो कारण अमेरिकेला शत्रूची व्याख्या करण्याची सवय आहे. माझा असा विश्वास आहे की सर्व देशांनी एकमेकांशी लढण्याची नाही तर सहकार्य करण्याची वेळ आली आहे. आपल्याला ही पद्धत बदलण्याची गरज आहे. चीन हा शत्रू आहे असे मानणे योग्य नाही. आता आपण संवाद वाढवण्यास शिकण्याची वेळ आली आहे.

### काय म्हणाले सॅम पित्रोदा?

सॅम पित्रोदा यांच्या विधानावर भाजपाने काँग्रेसवर जोरदार टीका केली आहे. भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना लक्ष्य केले. सॅम पित्रोदा यांच्या विधानावर सुधांशू त्रिवेदी म्हणाले, "सॅम पित्रोदा यांनी काँग्रेस पक्षाचा चीनसोबतचा करार उघडपणे समोर आणला आहे. गंभीर गोष्ट अशी आहे की, सॅम पित्रोदा यांनी जे काही म्हटले आहे ते भारताच्या प्रतिमेवर, राजनैतिकतेवर आणि सार्वभौमत्वावर खोलवर आघात करणारे आहे." इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांचे विधान पुन्हा एकदा वादात सापडले आहे. भारत-चीन वाद हा अमेरिकेने उगाच वाढवला असल्याचे पित्रोदा म्हणाले आहेत.

---

# चेंगराचेंगरी टाळण्यासाठी सरकारची योजना

## 60 प्रमुख रेल्वे स्थानकांवर होल्डिंग झोन तयार करणार?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर शनिवारी (१५ फेब्रुवारी) रात्री झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत १८ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण यात जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. ही चेंगराचेंगरी नेमकी कशामुळे झाली? याबाबत आता दिल्ली पोलीस आणि रेल्वे प्रशासन चौकशी करत आहे.**



मात्र, कुंभमेळ्याला जाण्यासाठी नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर मोठी गर्दी झाल्यामुळे ही दुर्दैवी घटना घडल्याची माहिती सांगण्यात येत आहे. चेंगराचेंगरीची घटना घडल्यानंतर आता केंद्र सरकार अलर्ट झालं आहे.गर्दी नियंत्रणात ठेवण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, आता नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) आणि दिल्ली पोलीस तैनात करण्यात आले आहेत. महाकुंभमेळ्यादरम्यान वाढत्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त सूत्रांच्या हवाल्याने इंडिया टुडेनी दिलं आहे.वृत्तानुसार, चेंगराचेंगरी सारख्या घटना पुन्हा घडू नये किंवा अशा घटना टाळण्यासाठी रेल्वेने देशातील ६० प्रमुख रेल्वे स्थानकांवर होल्डिंग झोन तयार करण्याची योजना आखली आहे. ६० पेक्षा जास्त रहदारीच्या रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची अतिरिक्त गर्दी हाताळण्यासाठी होल्डिंग झोन तयार करण्यात येणार आहेत. तसेच संकट व्यवस्थापनासाठी 'एआय'ची देखील मदत घेतली जाणार असल्याचं वृत्तात म्हटलं आहे.

### दिल्लीत घटना कशी घडली?

या बरोबरच स्थानिक अधिकारी संकट व्यवस्थापनाच्या अनुषंगाने प्रशिक्षण देखील घेतील असंही सांगण्यात येत आहे. या बरोबरच 'एआय'सह तंत्रज्ञानाचा वापर गर्दीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी करण्यात येणार आहे. विशेषतः ट्रेनच्या विलंबाच्या वेळी हा वापर करण्यात येणार आहे.रेल्वे स्थानकावर शनिवारी रात्री झालेल्या चेंगराचेंगरीतील मृतांचा आकडा १८ झाला असून त्यात ११ महिला व पाच मुलांचा समावेश आहे. या घटनेत अनेक जण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# लग्नानंतर 5 वर्षांनी मराठी अभिनेत्रीच्या घरी पाळणा हलला!

लग्नानंतर अनेक अभिनेत्री करिअरला ब्रेक देऊन आपलं वैयक्तिक आयुष्य तसेच संसार व घर सांभाळण्यास प्राधान्य देत असल्याचं आपण पाहिलं आहे. याशिवाय बॉलीवूडपासून ते मराठी इंडस्ट्रीपर्यंतच्या काही अभिनेत्री गेल्या काही वर्षांत लग्नानंतर विदेशात स्थायिक झाल्या आहेत. मराठी मालिकांमधून घराघरांत लोकप्रिय झालेल्या अभिनेत्री नेहा गद्रेने सुद्धा काही वर्षांपूर्वीच इंडस्ट्री सोडून परदेशी राहण्याचा निर्णय घेतला. यानुसार, नेहा सध्या आपल्या पतीसह ऑस्ट्रेलियात असते.'मन उधाण वाऱ्याचे', 'अजूनही चांद रात आहे' या मालिकांमुळे आणि 'मोकळा श्वास' या चित्रपटामुळे नेहाला एक वेगळी ओळख मिळाली होती. परंतु, सध्या ती अभिनयापासून दूर आहे. वैयक्तिक आयुष्यात २ मार्च २०१९ मध्ये तिने ईशान बापटशी विवाह केला. सध्या ते दोघेही ऑस्ट्रेलियात राहतात. काही दिवसांपूर्वीच ऑस्ट्रेलियाच्या समुद्रकिनाऱ्यावर बेबी बंपसह फोटो शूट



करत नेहाने आई होणार असल्याची गोड बातमी सर्वांना दिली होती. याशिवाय तिने जेंडर रिव्हिल सुद्धा केलं होतं. बाळाच्या जन्माआधी लिंग चाचणी करणं भारतात बेकायदेशीर आहे पण, विदेशात याला परवानगी आहे. त्यामुळे नेहाला आधीच मुलगा होणार की मुलगी हे समजलं होतं. जेंडल रिव्हिल केल्यावर नेहाला तिला मुलगा होणार असल्याची बातमी मिळाली. अभिनेत्रीने १० फेब्रुवारीला बाळाचं स्वागत केलं. यानंतर आज सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत नेहाने आई झाल्याची आनंदाची बातमी सर्वांना दिली आहे.

## रणवीरच्या अडचणीत वाढ

गेल्या काही दिवसांपासून देशभरात 'इंडियाज गॉट लेटेंट' मधील आक्षेपार्ह विधानांमुळे रणवीर अलाहबादीया हे नाव चर्चेत आहे. युट्यूबर आणि कॉमेडियन समय रैनाचा 'इंडियाज गॉट लेटेंट' हा कार्यक्रम लोकप्रिय आहे. मात्र, या कार्यक्रमात यूट्यूबर आणि पॉडकास्टर रणवीर अलाहाबादियाने एका स्पर्धकाला आक्षेपार्ह प्रश्न विचारल्याने तो वादात सापडला आहे. यावरून सोशल मीडिया वापरकर्त्यांसह विविध क्षेत्रातील लोकांकडून टीका करण्यात आली आहे. यावरून रणवीर अलाहाबादियाने माफी देखील मागितली. मात्र, आता रणवीर अलाहाबादियाला महाराष्ट्र सायबर सेलने २४ फेब्रुवारीला हजर राहण्यासाठी समन्स बजावल्याची माहिती समोर आली आहे. रणवीर अलाहाबादियाने 'इंडियाज गॉट लेटेंट' या वेब शोमध्ये पालक आणि लैंगिक संबंधांबद्दल केलेल्या वक्तव्यानंतर रणवीर अलाहाबादिया आणि इतरांविरुद्ध नोंदवलेल्या गुन्ह्याचा तपास एजन्सींकडून करण्यात येत आहे. रणवीर अलाहबादियाने केलेल्या वादग्रस्त विधानानंतर महाराष्ट्र सायबर विभागाने गुन्हा दाखल केल्यानंतर या प्रकरणातील अनेकांना चौकशीसाठी समन्स बजावले आहेत.

## क्रांतीची 'छावा'वर प्रतिक्रिया



सध्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित असलेल्या 'छावा' चित्रपटाची चर्चा सुरू आहे. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' चित्रपटाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटात छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका साकारलेल्या विकी कौशलवर कौतुकाचा वर्षाव होतं आहे. १३० कोटींचं बजेट असलेल्या 'छावा' चित्रपटाने भारतात आतापर्यंत १२१ कोटींची कमाई केली आहे. बॉक्स ऑफिसवर सध्या 'छावा' चित्रपटाची जोरदार घोडदौड पाहायला मिळत आहे. इतर कलाकार मंडळी सोशल मीडियावरद्वारे या चित्रपटाविषयी प्रतिक्रिया देत, चाहत्यांना चित्रपट पाहण्याचं आवाहन करताना दिसत आहेत. नुकताच अभिनेत्री क्रांती रेडकरने इन्स्टाग्राम व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये तिने 'छावा' चित्रपट पाहिल्यानंतरचा अनुभव सांगितला आहे. तसंच विकी कौशल, रश्मिका मंदाना, आशुतोष राणा, संतोष जुवेकर अशा चित्रपटातील सर्व कलाकारांचं कौतुक केलं आहे. क्रांती रेडकर म्हणाली, "माझे डोळे आताही सुजलेले दिसतायत. मी काल 'छावा' हा चित्रपट बघून आलीये. हा चित्रपट समजून घेण्यासाठी खूप अवघड आहे आणि तुम्हाला माणूस म्हणून जाणीव करून देतो की, तुम्ही समाजात कुठे उभे राहत आहात? माझी अशी इच्छा आहे, तुम्ही मराठी असाल किंवा अमराठी असाल, हा चित्रपट तुम्ही चित्रपटगृहात जाऊन बघा. हा एक खूप वेगळा अनुभव आहे."पुढे क्रांती रेडकर म्हणाली की, मला असं वाटतं की, धर्मवीर, छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत विकी कौशलने जे काम केलं आहे, ते इतकं स्तुत्य आहे. इतकं सुंदर आहे. ते महाराज होते, ते राजे होतेच. ते बघताना आपल्या अंगावर शहारा येत असतो. त्यांची प्रत्येक हालचाल, त्यांची प्रत्येक नजर, त्यांची देहबोली, त्यांनी ज्या प्रकारे चित्रपट डब केलाय, मला वाटतं, तो मास्टर क्लास आहे. प्रत्येक नटासाठी सुद्धा. तसंच रश्मिका मंदाना, आशुतोष राणा, संतोष जुवेकर बाकीच्या आपल्या सगळ्या मराठी कलाकारांनी जी साथ दिलीये, त्याच बरोबर सिनेमॅटोग्राफी, मेकेअप डिपार्टमेंटला तर साष्टांग दंडवत आहे.

## इब्राहिमच्या 'नादानियां' चित्रपटातील नवं गाणं प्रदर्शित

दिवंगत अभिनेत्री श्रीदेवी यांची मुलगी खुशी कपूर ( KHUSHI KAPOOR ) आणि सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम अली खान ( IBRAHIM ALI KHAN ) सध्या खूप चर्चेत आहेत. खुशी आणि इब्राहिमचा लवकरच 'नादानियां' नावाचा नवा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. याच चित्रपटातील दुसरं गाणं प्रदर्शित झालं आहे. 'गलतफेहमी' असं नव्या गाण्याचं नाव असून सध्या ट्रेंड होतं आहे.'नादानियां' या चित्रपटातून सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम अली खान बॉलीवूडमध्ये पदार्पण करत आहे. या चित्रपटात तो खुशी कपूरबरोबर मुख्य भूमिकेत पाहायला मिळणार आहे. काही दिवसांपूर्वी 'नादानियां' चित्रपटातील पहिलं गाणं प्रदर्शित झालं होतं. या गाण्यातील खुशी आणि इब्राहिमची केमिस्ट्री प्रेक्षकांना खूपच आवडली होती. त्यानंतर आता 'गलतफेहमी' हे दुसरं गाणं प्रेक्षकांच्या भेटीस आलं आहे. या गाण्यातून पुन्हा एकदा खुशी आणि इब्राहिमची जबरदस्त केमिस्ट्री पाहायला मिळत आहे.'नादानियां' चित्रपटातील 'गलतफेहमी' हे गाण्यावर प्रतिक्रिया देत एका नेटकऱ्याने लिहिलं, "हे गाणं ऐकून खूप भारी वाटलं." तर दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं की, तुमच्या दोघांची केमिस्ट्री खूप छान आहे. मी चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहे. तसंच तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "गाणं खूप छान आहे. मी सतत हे गाणं ऐकत आहे."दरम्यान, शौना गौतम यांना 'नादानियां' चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. धर्मा प्रोडक्शनच्या निर्मिती खाली हा चित्रपट तयार झाला आहे. या चित्रपटात खुशी कपूरने पिया नावाच्या मुलीची भूमिका साकारली आहे.

## ता अंबानींच्या थोरल्या सूनेच्या 'त्या' कृतीने सगळ्यांची जिंकली मनं

भारताचे मोठे उद्योगपती मुकेश अंबानी आणि त्यांचं कुटुंब नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतं. काही दिवसांपूर्वी मुकेश अंबानी आणि नीता अंबानींची धाकटी सून एका संगीत सोहळ्यामध्ये जबरदस्त डान्स करताना दिसली होती. तसंच त्याआधी अंबानी कुटुंब प्रयागराजमध्ये महाकुंभ मेळ्यात पाहायला मिळालं. यावेळी अंबानी कुटुंबाने एकत्र शाही स्नान केलं. याचे व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल झाले आहेत. त्यानंतर आता मुकेश अंबानी आणि नीता अंबानी यांच्या थोरल्या सूनेच्या एका व्हिडीओने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. हा व्हिडीओ पाहून अंबानींची थोरली सून श्लोका मेहताचं कौतुक केलं जात आहे.करीना कपूर-खान आणि सैफ अली खानचा मुलगा जेहची वाढदिवसाची पार्टी नुकतीच आयोजित करण्यात आली होती. या पार्टीला श्लोका



आपल्या मुलांना वेदा आणि पृथ्वीला घेऊन पोहोचली होती. या पार्टीतून बाहेर पडतानाच्या श्लोकाच्या एका कृतीने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं.व्हायरल व्हिडीओमध्ये, श्लोका आपल्या मुलांना घेऊन जेहच्या वाढदिवसाच्या पार्टीतून बाहेर पडताना दिसत आहे. यावेळेस दोन्ही मुलं मस्ती करत करत बाहेर पडतात. तेव्हा एकाच्या हातात भेटवस्तू दिसत आहे. ती भेटवस्तू बघण्यासाठी तो त्यावरचा कागद फाडत येत असतो आणि तेव्हाच त्याचा हातातून एक कागदाचा तुकडा खाली पडतो. हाच कागदाचा तुकडा पाहून लगेच श्लोका खाली वागते.

# स्मृतीच्या खेळीने दिल्लीची दाणादाण!

## सलग दुसरा सामना जिंकत मुंबईच्या विक्रमाची केली बरोबरी

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आरसीबीने महिला प्रीमियर लीग २०२५ मध्ये सलग दुसरा विजय नोंदवला आहे. सोमवारी खेळल्या गेलेल्या सामन्यात बंगळुरू कर्णधार स्मृती मंधानाच्या वादळी खेळीच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सचा ८ गडी राखून पराभव केला. त्याचबरोबर सलग पाचवा विजय मिळवत मुंबई इंडियन्सच्या विक्रमाची बरोबरी केली. वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात दिल्ली संघाने प्रथम फलंदाजी करत १४१ धावा केल्या.**

प्रत्युत्तरात आरसीबीने २२ चेंडू शिल्लक असताना दिल्लीचा पराभव केला. या सामन्यात आरसीबीची कर्णधार स्मृती मंधानाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो योग्य ठरला. दिल्लीने शफाली वर्माची विकेट लवकर गमावली पण मेग लॅनिंग आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांच्या ५९ धावांच्या भागीदारीने दिल्लीला चांगली सुरुवात करून दिली. रॉड्रिग्जने ३४ धावा केल्या, पण त्यानंतर संघाला मोठ्या भागीदारी रचण्यात संघर्ष करावा लागला. सारा ब्राइसने शेवटच्या षटकांमध्ये २३ धावा करून दिल्ली कॅपिटल्सना १४१ धावांचा सन्मानजनक आकडा गाठण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. कर्णधार स्मृती मंधानाच्या शानदार खेळीच्या जोरावर रॉयल आरसीबीने दिल्ली कॅपिटल्सचा आठ विकेट्सने पराभव करून डब्ल्यूपीएलच्या १८व्या हंगामात सलग दुसरा विजय मिळवला. डब्ल्यूपीएलमध्ये आरसीबीचा हा सलग पाचवा विजय आहे. यासह मुंबई इंडियन्सच्या विक्रमाची बरोबरी केली. प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने १९.३ षटकांत



१४१ धावा केल्या.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि दिल्ली कॅपिटल्स, ज्यांनी त्यांच्या सुरुवातीच्या सामन्यांमध्ये परस्परविरोधी विजय नोंदवले होते, ते सोमवारी येथे महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल) मध्ये एकमेकांसमोर येतील तेव्हा त्यांची विजयी मालिका सुरू ठेवण्याचे उद्दिष्ट ठेवतील. स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात गतविजेत्या आरसीबीने गुजरात जायंट्सचा सहा विकेट्सने पराभव केला तर दिल्ली कॅपिटल्सने मुंबई इंडियन्सवर शेवटच्या चेंडूवर विजय मिळवला. प्रत्युत्तरात, आरसीबीने १६.२ षटकांत दोन गडी गमावून १४६ धावा करून विजय मिळवला. दिल्ली कॅपिटल्सच्या १४२ धवांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चांगली सुरुवात केली आहे. कर्णधार स्मृती मानधना आणि सलामीवीर डॅनिएल वायट यांनी आरसीबीला चांगली सुरुवात करून दिली. आरसीबीने १०७ धावांवर गमावली पहिली विकेट, डॅनियलचे हुकले अर्धशतक. ती ४२ धावांवर बाद झाली. १२ षटकांनंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूची धावसंख्या ११२/१ आहे. स्मृती मानधना ६३ धावा काढल्यानंतर खेळत आहे आणि एलिस पेरी २ धावा काढल्यानंतर खेळत आहे.दोन्ही फलंदाजांनी पहिल्या विकेटसाठी १०७ धावांची भागीदारी केली. ही डब्ल्यूपीएलमध्ये दिल्लीविरुद्ध कोणत्याही विकेटसाठीची सर्वोच्च भागीदारी आहे. मंधानाने ८१ धावांची खेळी केली, तर डॅनियल अर्धशतक झळकावू शकली नाही.

### 141 धावांचा सन्मानजनक आकडा

त्याचबरोबर सलग पाचवा विजय मिळवत मुंबई इंडियन्सच्या विक्रमाची बरोबरी केली. वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात दिल्ली संघाने प्रथम फलंदाजी करत १४१ धावा केल्या, प्रत्युत्तरात आरसीबीने २२ चेंडू शिल्लक असताना दिल्लीचा पराभव केला. प्रत्युत्तरात आरसीबीने २२ चेंडू शिल्लक असताना दिल्लीचा पराभव केला. या सामन्यात आरसीबीची कर्णधार स्मृती मंधानाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो योग्य ठरला. दिल्लीने शफाली वर्माची विकेट लवकर गमावली पण मेग लॅनिंग आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांच्या ५९ धावांच्या भागीदारीने दिल्लीला चांगली सुरुवात करून दिली. रॉड्रिग्जने ३४ धावा केल्या, पण त्यानंतर संघाला मोठ्या भागीदारी रचण्यात संघर्ष करावा लागला. सारा ब्राइसने शेवटच्या षटकांमध्ये २३ धावा करून दिल्ली कॅपिटल्सना १४१ धावांचा सन्मानजनक आकडा गाठण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

# चल जाए तो चांद तक, वरना शाम तक

## अकमलने पाकिस्तानची उडवली खिल्ली

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धा १९ फेब्रुवारीपासून पाकिस्तान आणि यूएईमध्ये खेळली जाणार आहे. या मेगा इव्हेंटसाठी क्रिकेट पंडितांनी त्यांचे भाकित मांडण्यास सुरुवात केली आहे. बहुतेक माजी क्रिकेटपटू भारत आणि पाकिस्तानचे नाव उपांत्य फेरीत पोहोचण्याच्या संभाव्य संघांमध्ये घेत आहेत, परंतु एका माजी पाकिस्तानी क्रिकेटपटूचा असा विश्वास आहे की त्यांचा संघ उपांत्य फेरीतही पोहोचू शकणार नाही, ट्रॉफी जिंकणे तर सोडाच.**

पाकिस्तानचा संघ असा आहे की, 'चल जाए तो चांद तक, वरना शाम तक' अशी आहे. याशिवाय, जर त्यांचा संघ उपांत्य फेरीत पोहोचला, तर तो ही एक





मोठी कामगिरी मानेल असेही तो म्हणाला. कामरान अकमलने हिंदुस्तान टाईम्सला दिलेल्या मुलाखतीत हे वक्तव्य केले आहे. हिंदुस्तान टाईम्सशी बोलताना कामरान अकमल म्हणाला, "पाकिस्तान संघ असा आहे, चल जाए तो चांद तक, वरना शाम तक'. आमच्या संघात अनेक त्रुटी आहेत. गोलंदाजी संघर्ष करत आहे. फिरकी गोलंदाज नाहीत. सलामीवीर संघर्ष करत आहेत. निवडकर्त्यांनी आणि कर्णधाराने काय विचार केला हे मला माहित नाही. विशेष म्हणजे आमच्या चेअरमनने पण या संघला मान्यता दिली आहे. पाहूया परिस्थिती कशी पुढे जाते. पाकिस्तानशिवाय उर्वरित संघ बरेच संतुलित दिसत आहेत. त्यामुळे आम्हाला आणखी चांगल्या संघाची घोषणा करता आली असती. मला वाटतं भारत, न्यूझीलंड, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका हे संघ उपांत्य फेरीत पोहोचतील."कामरान अकमल पुढे म्हणाला, "पाच प्रमुख खेळाडूंना दुखापत झाल्यामुळे ऑस्ट्रेलियाचा संघ कमकुवत आहे. त्यामुळे अशा पाकिस्तान संघाची निवड करण्यामागे काय विचार आहे, हे मला माहित नाही. चेअरमन फारसे क्रिकेट खेळलेले नाही; कदाचित त्यामुळे त्यांना काही गोष्टी समजत नसतील. म्हणूनच त्यांनी अशा संघाला मान्यता दिली. भारत स्पष्टपणे प्रबळ दावेदार दिसत आहे; ते अंतिम सामना खेळण्यास पात्र आहेत. पण मी पाकिस्तानबद्दल असे म्हणू शकत नाही. जर ते उपांत्य फेरीत पोहोचले तर मी ते एक मोठे यश मानेन."पाकिस्तान ३० वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर आयसीसीच्या स्पर्धेचे आयोजन करणार आहे. या देशात शेवटचा विश्वचषक १९९६ मध्ये खेळला गेला होता, तेव्हा विराट कोहली ८ वर्षांचा होता आणि बाबर आझम एक वर्षाचा होता.पाकिस्तानचा माजी खेळाडू कामरान अकमलच्या मते पाकिस्तानचा संघ असा आहे की, 'चल जाए तो चांद तक, वरना शाम तक' अशी आहे.

# टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी सज्ज!

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

टीम इंडिया डोळ्यात चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकण्याचे स्वप्न घेऊन दुबईला पोहोचली आहे. रोहितचे लढवय्ये पुन्हा एकदा जागतिक क्रिकेटवर वर्चस्व गाजवण्यास सज्ज झाले आहेत. बुमराहची अनुपस्थिती निश्चितच धक्कादायक आहे, पण उत्साह पूर्णपणे उंचावलेला आहे. यावेळी रोहित शर्माची सेना १२ वर्षांचा दुष्काळ संपण्याचा प्रयत्न करेल.

भारतीय संघाचे वाघ यूएईच्या भूमीवरही डरकाळी फोडण्यासाठी सज्ज आहेत. या स्पर्धेला सुरुवात होण्यापूर्वी भारताचा दुबईत कसा रेकॉर्ड आहे? जाणून घेऊया.चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये रोहितच्या संघाला रोखणे कोणत्याही विरोधी संघासाठी सोपे नसेल. हे आम्ही म्हणत नाही आहोत, पण टीम इंडियाची अतुलनीय आकडेवारी ओरडून सांगत आहे आणि साक्ष देत आहे की यावेळी जेतेपद आपलेच आहे. टीम इंडियाला चॅम्पियन्स ट्रॉफीचे सर्व सामने दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळायचे आहेत.

आता जर तुम्हीही भारतीय क्रिकेटचे चाहते असाल आणि या स्पर्धेत टीम इंडिया चॅम्पियन व्हावी अशी प्रार्थना करत असाल तर तुमच्या सर्वांसाठी एक आनंदाची बातमी आहे.

भारतीय संघाने दुबईमध्ये आतापर्यंत एकूण सहा सामने खेळले आहेत, ज्यापैकी एकाही सामन्यात पराभवाचा सामना करावा लागलेला नाही. टीम इंडियाने पाच सामने जिंकले आहेत आणि एक सामना बरोबरीत सुटला आहे. आता जर रोहितची सेना दुबईमध्ये हा विक्रम राखण्यात यशस्वी झाली तर टीम इंडिया चॅम्पियन ट्रॉफी जिंकलेली असेल.

## निसर्गवर्णनाच्या अभिवाचनाचा कार्यक्रम

# जागतिक रेडिओ दिनानिमित्त 'नागझिरा' अभिवाचन!

### शिक्षण विश्व: पिंपरी-चिंचवडमध्ये 'पीसीइटी इन्फिनिटी 90.4 एफएम' चा उपक्रम





। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**या जागतिक रेडिओ दिनानिमित्त साधून 'पीसीइटी इन्फिनिटी ९०.४ एफएम' च्या वतीने निगडी, प्राधिकरण येथील वीर सावरकर उद्यानात 'आदिम' प्रस्तुत व्यंकटेश माडगूळकर लिखित 'नागझिरा' या निसर्गवर्णनाच्या अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.**

'रेडिओ आणि हवामान बदल' ही यंदाच्या जागतिक रेडिओ दिनाची मध्यवर्ती संकल्पना होती. सामान्य माणसाच्या मनात निसर्गाबद्दल आपलेपणाची भावना आणि जबाबदारीची जाणिव निर्माण व्हावी या उद्देशाने भंडारा जिल्ह्यातल्या नागझिरा जंगलात राहून व्यंकटेश माडगूळकर यांनी लिहिलेल्या जंगलातले दिवस या सचित्र नोंदवहीचे हे अभिवाचन डॉ. विनया केसकर आणि विराज सवाई यांनी केले. यासाठी चैतन्य जोशी यांनी पुरक असे पार्श्वसंगीत संयोजन केले होते. झाडावर लटकवलेला कंदील, तिरोडा ३२ किमी हा मैलाचा दगड, पितळी तांब्या भांडे, बैठकीवर टाकलेली कांबळ, नागझिरा जंगलाचा नकाशा अशा वस्तूंनी साधलेल्या वातावरणनिर्मितीने कार्यक्रमाची उंची वाढवली. विविध वयोगटातील उपस्थित निसर्गप्रेमी प्रेक्षकांनी वाचनास भरभरून प्रतिसाद दिला. "तळ्यापलीकडे, डोंगराच्या उतारावर जी वृक्षराजी होती, तिच्यात काळ्या डोक्याचे पिवळे हळदुले पक्षी पुष्कळ होते. पिवळ्यारंजन रंगाची ही पाखरं जेव्हा या वृक्षावरून त्या वृक्षावर भरारत, तेव्हा पिवळ्या शाल्मलीच्या फुलांनाच पंख फुटले आहेत असं, वाटे." "समोरच्या हिरवळीवर नाना कीटक होते. हे कीटक टिपण्यासाठी नाना पाखरं येत. एक नीलकंठ पाखराचं जोडपं येई, हे नीळंगर्द पाखरू पंख पसरून अधांतरी झेप घेई तेव्हा माझ्या मनात येई, की स्वातंत्र्य या वस्तूचा रंग बहुधा निळा असावा" अश्या अनेक मार्मिक वाक्यांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी देवराई फाऊंडेशनचे संस्थापक आणि पीसीएमसी स्मार्ट सिटी कमिटीचे सदस्य धनंजय शेडबळे, पीसीईटी च्या मीडिया अँड ब्रँडिंग विभागाचे प्रमुख डॉ. केतन देसले, प्रा. आनंद बिराजदार, डेक्कन कॉलेजच्या प्रा. डॉ. प्रज्ञा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# पवनाथडी जत्रेसाठी महिला बचतगटांना लकी ड्रॉ पद्धतीने स्टॉलचे वाटप

### सहायक आयुक्त तानाजी नरळे : महिलांनी तयार केलेल्या वस्तू त्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महानगरपालिकेच्या वतीने महिला व बाल कल्याण योजनेंतर्गत महापालिका हद्दीतील महिला बचतगटांनी तसेच वैयक्तिक महिलांनी तयार केलेल्या वस्तू उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांना विपणन कौशल्ये ज्ञात व्हावीत, एकूणच महिला उद्योजिका तयार होऊन महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात यासाठी पवनाथडी जत्रेचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. यावर्षी देखील २१ ते २४ फेब्रुवारी या कालावधीत सांगवी येथील पी. डब्ल्यू. डी मैदान येथे पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये खाद्यपदार्थांसह विविध वस्तूंची विक्री व प्रदर्शन करणाऱ्या बचतगटांना पवनाथडी जत्रेतील स्टॉलचे वाटप लकी ड्रॉ पद्धतीने करण्यात आले त्यावेळी नरळे बोलत होते.**




महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृह येथे पवनाथडी जत्रेत महिला बचतगटांना वस्तू विक्री व प्रदर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या स्टॉल्सची सोडत सहायक आयुक्त तानाजी नरळे यांच्या हस्ते लकी ड्रॉ द्वारे पद्धतीने काढण्यात आली.

यावेळी प्रशासन अधिकारी पूजा दुधनाळे, समाज विकास विभागाचे अनिता बाविस्कर, संतोषी चोरघे, कल्पना मदगे, रेश्मा पाटील, वैशाली खरात, विशाल शेंडगे, संगिता रुद्राक्षे, प्रज्ञा कांबळे, अनिकेत सातपुते, विजय देवळेकर, जयश्री पवळे, सुलक्षणा कुरणे, अमोल कावळे, मनोज मरगडे, कीर्ती वानखेडे, लखन अहिरे, रवी दुबे, तसेच विविध महिला बचत गटांच्या प्रतिनिधी आणि महापालिका कर्मचारी उपस्थित होते. पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून महिला बचत गटांच्या उत्पादनांना एक खुले व्यासपीठ महापालिकेच्या वतीने उपलब्ध करून दिले जात आहे. यामुळे महिला बचत गट सक्षम बनत असून त्यांच्या दर्जेदार उत्पादनांना प्रसिद्धीदेखील मिळत आहे. पवनाथडी जत्रेत वस्तू विक्री व प्रदर्शनासाठी स्टॉल उपलब्ध व्हावेत यासाठी बचत गटांच्या प्रतिनिधींनी महापालिकेकडे अर्ज सादर केले होते. त्यानुसार सुमारे ७५० बचत गटांना लकी ड्रॉ द्वारे स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामध्ये दिव्यांग तसेच तृतीयपंथीयांसाठी देखील काही स्टॉल्स राखीव ठेवण्यात आले आहेत, अशी माहिती सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी दिली. यावेळी उपस्थित महिला बचत गटांच्या प्रतिनिधींच्या हस्तेही लकी ड्रॉ मध्ये असलेल्या चिठ्ठ्यांची निवड करण्यात आली आणि पवनाथडी जत्रेतील स्टॉल्सची निश्चिती करण्यात आली.

## ‘शहराचे सौंदर्य वाढवण्यासाठी

# विद्युत ठेकेदार महत्त्वाचा घटक!

### आमदार शंकर जगताप : विद्युत ठेकेदारांची इकॅम सारखी संस्था शहरात होणे आवश्यक

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतातील प्रत्येक घरात वीज पुरवठा देणे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ध्येय आहे. मेक इन इंडिया प्रकल्पाअंतर्गत सोलर सारखा अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढवून, ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्यासाठी विद्युत ठेकेदारांना खूप काम करावे लागणार आहे. विद्युत ठेकेदारांनी आता आधुनिकतेचा स्विकार केला पाहिजे. वेगाने वाढत असलेल्या पिंपरी चिंचवड शहरात मेट्रो, रस्ते, अनेक व्यावसायिक, निवासी बांधकाम प्रकल्प विकसित करण्यासाठी, शहराचे सौंदर्य वाढवण्यासाठी विद्युत ठेकेदार महत्त्वाचा घटक असणार आहे. विद्युत ठेकेदारांची इकॅम सारखी संस्था शहरात होणे आवश्यक होते असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.**



राज्यातील विद्युत ठेकेदारांच्या इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (इकॅम) या संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त आणि पिंपरी चिंचवड विभागीय शाखा स्थापनेच्या उद्‌घाटन प्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात आ. जगताप बोलत होते.

यावेळी इकॅम महाराष्ट्र अध्यक्ष उमेश रेखे, सचिव देवांग ठाकूर, इकॅम पिंपरी चिंचवड अध्यक्ष सयाजी पाटील, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बाळासाहेब कदम जळगाव अध्यक्ष बाबुभाई मेंहदी, महाराष्ट्र माजी अध्यक्ष वामन भुरे, अहिल्यानगर अध्यक्ष दत्ता झिंजुर्डे, धुळे – नंदुरबार अध्यक्ष प्रवीण बडगुजर, पिंपरी चिंचवड सचिव रमेश भालेराव, खजिनदार संजय कुमार, सहसचिव गजानन पेटसांगवे, मुख्य कार्यालय संचालक मंगेश लोडम, पिंपरी चिंचवड संचालक विजय काकडे, विजय शहाणे, बाबासाहेब जोंधळे आदींसह पिंपरी चिंचवड शहरातील सभासद तसेच राज्यभरातून आलेले प्रतिनिधी उपस्थित होते.

स्वागत, प्रास्ताविक करताना पिंपरी चिंचवड अध्यक्ष सयाजी पाटील यांनी सांगितले की, इकॅमच्या शताब्दी वर्षामध्ये पिंपरी चिंचवड विभागीय शाखेला मान्यता मिळणे हे गौरवास्पद आहे. यासाठी मागील पंधरा वर्षापासून पाठपुरावा करण्यात येत होता. महाराष्ट्र असोसिएशनने पिंपरी चिंचवडच्या सभासदांवर दाखवलेला हा विश्वास निश्चितच सार्थ ठरवू. आमदार शंकर जगताप यांनी निवडून आल्यानंतर पहिल्याच विधानसभा अधिवेशनात महावितरणच्या विषयावर चर्चा घडवून आणली, असेच पुढील काळात देखील मिळावे अशी अपेक्षा सभासदांच्या वतीने पाटील यांनी व्यक्त केली. आभार अरुण वाघमारे यांनी मानले.

---

# महापालिकेचे अंदाजपत्रक २१ फेब्रुवारी रोजी स्थायी समितीसमोर सादर होणार

### आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची माहिती

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठीचे सुधारित अंदाजपत्रक आणि २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचे मूळ अंदाजपत्रक स्थायी समितीसमोर ठेवण्यासाठी २१ फेब्रुवारी रोजी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.**




सन २०२५-२६ चे मूळ अंदाजपत्रक स्थायी समितीसमोर ठेवण्यासाठी पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे २१ फेब्रुवारी २०२५ रोजी विशेष सभेचे आयोजन करण्यात येत आहे.

या विशेष सभेमध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह मूळ अंदाजपत्रकाचे सादरीकरण करणार आहे. या अंदाजपत्रकात केंद्रशासनाच्या पुरस्कृत विविध योजना, प्रशासकीय सुविधा, विविध विकासकामे, भूमिपूजन, आरोग्य, स्थापत्य विषयक कामे, शहरातील नागरिकांसाठी पायाभूत सुविधा, तसेच विविध विकासकामांसाठी अत्यावश्यक निधी, तरतुदी, महसूल आदी बाबींचा तपशील देण्यात येणार आहे.

---

# येत्या २२ व २३ फेब्रुवारी रोजी स्वरश्री संगीत महोत्सवाचे आयोजन

। पिंपरी । प्रतिनिधी महाईन्यूज ।

थेरगाव येथील स्वरश्री फाउंडेशनच्या वतीने येत्या 22 व 23 फेब्रुवारी रोजी स्वरश्री संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव औंध येथील पंडित भीमसेन जोशी कला मंदिर येथे सायंकाळी चार वाजता होणार आहे. यंदाचा स्वरश्री पुरस्कार ज्येष्ठ गायक शिवदास देगलूरकर यांना आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सतारवादक उ. उस्मान खाँ यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

या महोत्सवात 22 फेब्रुवारी रोजी नामदेव शिंदे यांचे शास्त्रीय गायन, अंजली शिंगडे – राव यांचे व्हायोलिन वादन, उस्ताद अर्षद अली यांचे शास्त्रीय गायन होणार आहे; तर 23 फेब्रुवारी रोजी आरती ठाकूर यांचे शास्त्रीय गायन, विवेक सोनार यांचे बासरी वादन, तर भीमसेन जोशी यांचे पुत्र पं. श्रीनिवास जोशी यांचे शास्त्रीय गायन होणार आहे.

महोत्सवात संवादिनी साथसंगत उदय कुलकर्णी, गंगाधर शिंदे, अमेय बिच्चू, तर तबल्यावर प्रशांत पांडव, पं. समीर सूर्यवंशी, किशोर कोरडे, गणेश तानवडे, निलेश रणदिवे, कार्तिक स्वामी साथसंगत करतील. पखवाजवर गंभीर महाराज, तर टाळ साथसंगत शिवाजी डाके, मकरंद बादरायणी करतील. कार्यक्रमाचे निवेदन नामदेव तळपे आणि आकाश थिटे करणार आहेत, अशी माहिती महोत्सवाचे संयोजक नामदेव शिंदे यांनी दिली.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING **MIND & HEART**

## ADMISSIONS OPEN
**FOR AY 2025-26**

# Holistic Empowering Learning

IT ALL **STARTS HERE**



**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION

**55+** NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS

**11+** CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA

**17K+** 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES

**600+** TEACHING AND NON TEACHING STAFF

**13K+** 13,000 ALUMNI ACROSS GLOBE

**PRIYADARSHANI** GROUP OF SCHOOLS

BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826

alandi@priyadarshanischools.org


www.priyadarshanischools.org

# ‘डिजिटल इंडिया, स्मार्ट सिटी मिशन यामुळे संशोधनासाठी पोषक वातावरण’

## संगणक तज्ञ अतुल कहाते; सायबर सुरक्षा, डिजिटल पायाभूत सुविधा यामध्ये भारताची वेगाने प्रगती

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज**

कृषी, वित्त आणि उत्पादन यासारख्या प्रमुख क्षेत्रामध्ये भारत जलद गतीने प्रगती करत आहे. नवतंत्रज्ञानाचा स्वीकार करून देशात आरोग्य सेवा देखील प्रगतीपथावर आहे. यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता सारखे तंत्रज्ञान, डेटा ॲनालिटिक्स, आयओटी आणि फाईव-जी या आधुनिक संकल्पनेचा उपयोग होत आहे. डिजिटल इंडिया, स्मार्ट सिटी मिशन तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेसाठीचे प्रस्तावित राष्ट्रीय धोरण यामुळे तांत्रिक संशोधन, विकास आणि प्रयोगांसाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. सायबर सुरक्षा, डिजिटल पायाभूत सुविधा यामध्ये भारत वेगाने प्रगती



करत आहे. अशा क्षेत्रात करिअर करण्याच्या दृष्टीने आयोजित केलेली आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी परिषद हे एक क्रांतिकारी महत्वपूर्ण पाऊल आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ संगणक तज्ञ अतुल कहाते यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) मध्ये “आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी परिषद (आयसीईटीसी २०२५) अंतर्गत “फर्स्ट इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन इमर्जिंग टेक्नॉलॉजी अँड कम्प्युटिंग” या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी पीसीसीओईआरचे प्राचार्य डॉ. हरिश तिवारी, विभाग प्रमुख आणि समन्वयक डॉ. अर्चना चौगुले, डॉ. अर्चना कोलू, डॉ. वैशाली लटके आदी उपस्थित होते. यावेळी अतुल कहाते यांनी सांगितले की, तंत्रज्ञान क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ताने (एआय) एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. एआयचे जॉर्ज बुल, अलान टुरिंग, फ्रँक रोसनबोल्ट, मॅककॉर्थी, जॉफरी हिंटोन, अल्टमन या शास्त्रज्ञांनी प्रथम संशोधन केले. चॅट जीपीटीला टेक्स्ट नाही तर बायनरी भाषा समजते. तंत्रज्ञान दरवर्षी १० टक्के बदलत असते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी एकच नियम पाळावा तो म्हणजे शिका, शिका आणि शिका कारण शिकण्याचा अंत नाही असे कहाते यांनी सांगितले.

पीसीसीओईआरचे प्राचार्य डॉ. हरिश तिवारी यांनी सांगितले की, आयसीईटीसी २०२५ ही परिषद शैक्षणिक उपक्रमासह ज्ञान, संकल्पना आणि प्रेरणेचा स्त्रोत आहे. संशोधक, प्राध्यापक, उद्योजक, विद्यार्थी यांना एकत्र घेऊन भविष्यातील तंत्रज्ञानाची दिशा ठरवण्याची ही एक उत्तम संधी आहे. यातून एकमेकाला सहकार्य करीत ज्ञानाची देवाण-घेवाण करून, येणाऱ्या आव्हानांना सामोरे जात, नवीन उपक्रमाला चालना देऊन विद्यार्थ्यांनी यामध्ये नवीन संधी शोधून आपले ध्येय गाठायचे आहे असे सांगितले.

### विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक डॉ. अर्चना कोलु, आभार डॉ. वैशाली लटके यांनी मानले.

